क्र.पोमसं/१६/८३००/सद्भावना दिवस/६७/२०१६-१७ मुंबई, दिनांक: - १९/०८/२०१७

**विषय** :- दिनांक २० ऑगस्ट, २०१७ " **सद्भावना दिवस** " व दिनांक २० ऑगस्ट, २०१७ ते ५ सप्टेंबर, २०१७ हा पंधरवडा " **सामाजिक ऐक्य पंधरवडा** " म्हणून साजरा करण्याबाबत.....

**************

उपरोक्त विषयाबाबतच्या शासन परिपत्रक, अल्पसंख्यांक विकास विभाग, क्र. अविवि-२०१७/प्र.क्र.७४/का.८, दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ ची प्रत माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

(नम्रता लब्दे)
कार्यासन अधिकारी,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

**प्रति,**

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, कारागृह / गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक/प्रशिक्षण व खास पथके/ वाहतूक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन/कारागृह, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
विशेष पोलीस महानिरीक्षक, म.अ.प्र.वि., महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह)/विशेष कृती, नागपूर.
समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र. १ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण केंद्र, नाशिक.

म. म. स. म. रा. मुंबई
08 214
18 AUG 2017
124106117
16 4 5
आवक क्रमांक

**दि. २० ऑगस्ट, २०१७ हा दिवस "सदभावना दिवस" व दि. २० ऑगस्ट, २०१७ ते ५ सप्टेंबर, २०१७ हा पंधरवडा "सामाजिक ऐक्य पंधरवडा" म्हणून साजरा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः अविवि-२०१७/ प्र.क्र.७४/का.८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ११ ऑगस्ट, २०१७

**शासन परिपत्रक -**

युवा व क्रिडा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या निदेशानुसार दिवंगत पंतप्रधान मा.राजीव गांधी यांचा जयंती दिवस २० ऑगस्ट हा दिवस दरवर्षी "सदभावना दिवस" म्हणून साजरा करण्यात येतो. तसेच मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या कार्यालयीन ज्ञापन क्र.एफ-२८-२२/२००६-वा.एस-४, दि.१८.७.२००६ अन्वये देण्यात आलेल्या निदेशास अनसरुन, उपरोक्त सदभावना दिवसाच्या अनुषंगाने दिनांक २० ऑगस्ट, २०१७ ते ५ सप्टेंबर, २०१७ हा पंधरवडा "सामाजिक ऐक्य पंधरवडा" म्हणून साजरा करण्याचे शासनाने ठरविले आहे. राज्यातील विविध प्रदेशातील अनेक धर्मांच्या व अनेक भाषा बोलणाऱ्या लोकांमध्ये एकमेकाविषयी ऐक्याची भावना, सौहार्द भाव वृध्दीगंत करणे व हिंसाचार टाळणे ही प्रमुख उदिष्टे हा पंधरवडा साजरा करण्यामागे आहेत.

२. दि.२० ऑगस्ट, २०१७ हा "सदभावना दिवस" म्हणून साजरा करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

अ) मंत्रालयाच्या प्रांगणात दि. २० ऑगस्ट, २०१७ रोजी "सदभावना दिवस" साजरा करण्यात यावा व सर्व उपस्थितांना सदभावना दिवसाची प्रतिज्ञा घेण्यास सांगण्यात यावे, तसेच या दिवशी सदभावना शर्यतही आयोजित करण्यात यावी. याबाबत कार्यपध्दती कशी असावी याची प्रत आणि प्रतिज्ञेची प्रत सोबत जोडली आहे.

ब) बृहन्मुंबईत लोकांच्या विशेषत: युवकांच्या सहभागाने संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य यांनी सदशावना या विषयावर समुहगान आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत.

क) महसूल विभागाच्या आयुक्तांनी सदभावना शर्यत आयोजित करण्यासह त्यांच्या कार्यालयातून सदभावना दिवसाची प्रतिज्ञा घेण्याचा कार्यक्रम आयोजित करावा. (शर्यतीची कार्यपध्दती आणि प्रतिज्ञेचा नमुना सोबत जोडला आहे.)

ड) राज्यातील सर्व शासकीय कार्यालये, जिल्हांच्या मुख्यालयात व संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्वधर्म प्रार्थना सभा घेण्यात यावी व सर्व उपस्थितांना सदभावना शपथ घेण्यास सांगण्यात यावे. तसेच सदभावना शर्यत आयोजित करावी (नमुना

Pl. circulate to all unit Commanders
29/8/96
S

सोबत जोडला आहे). तसेच युवकांच्या सहभागाने सदभावना या विषयावर समुहगान आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत.

ह) विद्यापीठे, महाविद्यालये आणि शाळांमध्ये सुध्दा अशाच तऱ्हेचे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. या विषयीचे आवश्यक ते आदेश शालेय शिक्षण तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभागाने संबधितांना द्यावेत. नेहरू युवा केंद्र, भारत स्काऊट आणि गाईडस, व राष्ट्रीय सेवा योजना यांना देखील कार्यक्रमामध्ये सहभागी करून घेण्यात यावे.

३. याशिवाय दिनांक २० ऑगस्ट, २०१७ ते ५ सप्टेंबर २०१७ हा पंधरवडा "सामाजिक ऐक्य पंधरवडा" म्हणून राज्यात साजरा करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

अ) सामाजिक ऐक्याचा संदेश प्रसृत करण्यासाठी मानवी साखळी (Human Chain) सारखे कार्यक्रम राज्यातील जिल्हा मुख्यालयात, संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करावेत.

आ) जिल्हाधिकाऱ्यांनी युवक परिषदा आयोजित करून त्यामध्ये जिल्हातील प्रख्यात स्वातंत्र्य सैनिकांना भाषण देण्यासाठी निमंत्रित करावे.

इ) सदर पंधरवडयात जिल्हांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी इतर सांस्कृतिक कार्यक्रम सुध्दा आयोजित करावेत.

ई) संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सदर पंधरवडयामध्ये बृहन्मुंबईत सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत.

४. उपरोक्त "सदभावना दिवस" व "सामाजिक ऐक्य पंधरवडा" या कार्यक्रमांच्या प्रसिध्दीसाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने दूरदर्शन व आकाशवाणीच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी संपर्क साधून कार्यक्रमांना पुरेशी प्रसिध्दी दयावी.

५. उपरोक्त कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याची खबरदारी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावी व कार्यक्रम पार पाडल्यानंतर शासनास त्याचा अहवाल सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७०८१११७५३५९८९१४ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandesh Chhabu Tadvi

Digitally signed by Sandesh Chhabu Tadvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=39e858554371a26f6672b036224cff0a48a63a836a4067a8da9a8cca6d83429e, cn=Sandesh Chhabu Tadvi
Date: 2017.08.11 17:46:23 +05'30'

(सं.छ.तडवी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा. राज्यपालांचे सचिव

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,